E-2850273/18

**महाराष्ट्र शासन**

क्र.बैठक-०६१७/प्र.क्र.१४०/अधिनियम
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
नवीन मंत्रालय वा९ ,मजला,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग ,मुंबई- ४०० ००१.

दिनांक: २२.०१.२०१८.

**प्रति,**
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व पोलीस आयुक्त.
सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक.

विषय : राज्यातील इलेक्ट्रोपॅथी व इलेक्ट्रोहोमिओपॅथीमधील व्यवसाय करण्यबाबत...

संदर्भ : १) शासन पत्र, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्र.एमआयएस-१०१०/प्र.क्र.२२१/अधिनियम, दिनांक १८.११.२०१०.
२) शासन पत्र, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्र. संकीर्ण-०११४/प्र.क्र.१५३/१४/अधिनियम, दिनांक २५.०६.२०१४.

CS + DHO

23 JAN 2018

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयाबाबत इलेक्ट्रोपॅथी/ इलेक्ट्रोहोमिओपॅथी अभ्यासक्रमास शासनाची मान्यता नसताना व त्याआधारावर योग्य ते अधिकृत वैद्यकीय व्यवसायाचे नोंदणी प्रमाणपत्र नसतानाही ज्या व्यक्ती वैद्यकीय व्यवसाय करीत आहेत त्यांचेकरिता संदर्भित पत्रात निर्देश दिलेले आहेत. तथापि, सदरहू निर्देश स्पष्ट नसल्याने त्यामध्ये अधिक सुस्पष्टता आणण्यासाठी/ सुधारणा करणे शासनाच्या विचाराधीन होते.

२. त्या अनुषंगाने शासनाच्या संदर्भित दिनांक २५.०६.२०१४ (प्रत संलग्न) रोजीच्या पत्र क्र.२ मधील **"परिच्छेद क्रमांक (६), इलेक्ट्रोपॅथी किंवा इलेक्ट्रोहोमिओपॅथीधारक महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ अंतर्गत नोंदणीशिवाय, खालील अटींच्या अधिन, इलेक्ट्रोपॅथी किंवा इलेक्ट्रोथेरपीचा व्यवसाय करु शकतील, यापुढे नमूद करण्यात आलेल्या अट क्र. ii नंतर अट क्र. iii, iv व v" याद्वारे समाविष्ट करण्यात येत आहे.**

**अटी:-**

iii. उक्त व्यक्ती ही त्यांच्या रुग्णालयाच्या/ दवाखान्याच्या बोर्डावर अथवा त्यांच्या लेटरहेडवर स्वत:च्या नावामागे वा पुढे "डॉक्टर", "वैद्य", "हकीम" किंवा तत्सम संबोधन लावू शकणार नाहीत.

P. 2

Scanned by CamS

सर्व पाने = २४१

iv. उक्त व्यक्ती ही फक्त इलेक्ट्रोपॅथी किंवा इलेक्ट्रोथेरपीचीच औषधे रुग्णांना देऊ शकतील व इतर कोणत्याही चिकित्सा पध्दतीची औषधे रुग्णांना देता येणार नाही.

v. उक्त व्यक्ती ही फक्त इलेक्ट्रोपॅथी किंवा इलेक्ट्रोथेरपीचीच औषधे रुग्णांना लिहून देऊ शकतील व त्या पध्दतीच्या औषधांचा साठा रुग्णालयात/ दवाखान्यात ठेवू शकतील व इतर कोणत्याही चिकित्सा पध्दतीची औषधे रुग्णांना लिहून देऊ शकणार नाही व अन्य चिकित्सा पध्दतीच्या औषधांचा साठा ठेवू शकणार नाहीत.

आपला,

(सुरेंद्र प्र. चानकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

सोबत: वरीलप्रमाणे.

प्रत:-

१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. प्रबंधक, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन, २३१, कमिसरिएट बिल्डिंग, ३रा मजला, खादी ग्रामोद्योग भवनच्या समोर, डी.एन. रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
४. अधिनियम कार्यासन संग्रहार्थ.